विभागीय आयुक्त कार्यालय
(सामान्य प्रशासन विभाग) विधान भवन, पुणे-१
ई मेल- gb.divcompune@gmail.com दुरध्वनी क्र.०२०-२६३६१०६८

क्र. कार्या/साप्र-३/कावी २५२/२०२५ पुणे दिनांक १४/८/२०२५

प्रति,

१. रेनबो एंटरप्रायजेस,३५१. सोमवार पेठ, पुणे- ०११
२. अलंकार स्टोअर्स, सोमवार पेठ,पुणे- ०११
३ विजयशांती मार्केटिंग, लोडगे चौक, पुणे -०११
४. पीसी मॅडनेस सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, सोमवार पेठ, पुणे -११
५. अंजूम स्क्रीन आर्टस, पुणे
६. रचना टेक्नॉलॉजी , पुणे

विषय :- सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे या कार्यालयासाठी Wifi Router, Fiber connection. बसविणेकामी दरपत्रके मागविणेबाबत

सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे या कार्यालयासाठी Wifi Router, Fiber connection बसविणेसाठी पुरवठादारांकडून खालील अटी व शर्ती यांच्या अधीन राहून आपणाकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. सोबत दरपत्रक मागविणेबाबतचा विहीत नमुना जोडलेला आहे.

१. दरपत्रक हे उपआयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे विभाग, पुणे यांचे नावे देण्यात यावे.
२. दरपत्रक सादर करण्याची मुदत दिनांक २८ /०८/२०२५ रोजी सायंकाळी १७.१५ वाजेपर्यंत राहील.
३. उपरोक्त मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २९/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. अपर आयुक्त (सा.प्र) पुणे विभाग, पुणे यांच्या दालनात दरपत्रक समितीसमोर उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्यावेळी पुरवठादार यांना स्वत: उपस्थित राहता येईल किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीला दरपत्रके उघडण्याचे वेळी उपस्थित रहाता येईल. तथापि सदर प्रतिनिधीकडे पुरवठादाराचे प्राधिकारपत्र असणे आवश्यक आहे. अन्यथा त्यास उपस्थित राहण्यास अनुमती दिली जाणार नाही.
४. दरपत्रक सीलबंद लिफाफयात सादर करावे. सदर लिफाफयावर Wifi Router, Fiber connection जोडणे बाबत दरपत्रके असे नमूद करावे.
५. उपरोक्त मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.
६. दरपत्रक पुरवठादाराने त्याच लेटर हेडवरच सही व शिक्यानिधी सादर करणे आवश्यक आहे.
७. उपरोक्त लेटर हेडवर पुरवठा दाराने त्याचा GSTN Registration No नमूद करावा.
८. अनुपस्थित असणा-या पुरवठादारांना नंतर दरपत्रके मागविणे, उघडणे आणि स्विकृत करणे याबाबत तक्रार/हरकती करता येणार नाहीत.
९. अनुपस्थित असणा-या पुरवठादारांना नंतर दरपत्रके मागविणे, उघडणे आणि स्विकृत करणे याबाबत तक्रार/हरकती करता येणार नाहीत.
१०. खरेदी प्राधिकारी यांचेबरोबर कोणतेही हितसंबंध नसलेबाबत प्रमाणपत्र देण्यात यावे. तसेच एकल निविदा देण्याबाबत निविदाधारकांचे हमी प्रमाणपत्र देण्यात यावे.
११. उघडण्यात आलेल्या दरपत्रकातील सर्वात कमी दर बाबनिहाय स्विकृत करण्यात येतील.
१२. ज्या पुरवठादारांची बाबनिहाय दरपत्रके स्विकृत करण्यात येतील, त्यांना विषयांकित कालावधीत दरपत्रकात नमूद करण्यात आलेल्या दराने पुरवठा करणेबाबत बंधपत्र सादर करावे लागेल. सदर बंधपत्र प्राप्त झाल्या नंतरच त्यांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार पुरवठा आदेश देण्यात येतील.
१३. दरपत्रकात नमूद करावयाचे दर हे सर्व करांसहित नमूद करावे. त्यानुसारच स्विकृत दरपत्रकातील दरानुसारच संबंधित पुरवठादारास रकमेचे प्रदान करण्यात येतील.

ACE Scanner

१४. दरपत्रक तयार करताना पुरवठादाराने दरपत्रकासोबत अग्रेषण पत्रामध्ये (Forwarding Letter) या पत्राचा संदर्भ दयावा. तसेच या पत्रामधील सर्व अटी व शर्ती पुरवठादारास मान्य असल्याचे स्पष्टपणे नमूद करावे.

१५. पुरवठादाराचे पॅन असणे आवश्यक आहे. पॅन किंवा GST मध्ये काही अडचणी असल्यास त्या पुरवठादाराच्या नावाचा विचार केला जाणार नाही/सदर बाब निदर्शनास आल्यास त्याबाबत खरेदी समिती अंतिम निर्णय घेईल.

१६. दरपत्रकात नमूद दराने व त्याच दर्जाचे सुविधा देणे बंधनकारक राहील.

१७. पुरविण्यात येणा-या सुविधेबाबत कुठल्याही शाखेची तक्रार येणार नाही, याची दक्षता पुरवठादाराने घ्यावी.

१८. दरपत्रक मंजूर करणे बाबतचा अंतिम निर्णय हा दरपत्रक समितीचा असणार आहे.

१९. सर्व कामकाज पूर्ण झाल्यावर देयकाची रक्कम अदा केली जाईल.

२०. अंतिम पूरवठा आदेश पारित केलेनंतर आठ दिवसाचे आत उपरोक्त अटी-शर्ती मान्य असलेबाबत हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

(तुषार ठोंबरे) १४/३/२५
अपर आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे विभाग,पुणे

प्रत :- नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करणेकामी.

टिप :- उपरोक्त पुरवठादार यांचेव्यतिरिक्त अन्य इतर पुरवठादार ही सदर निविदाप्रक्रियेमध्ये सहभागी होणेसाठी इच्छुक असतील तर ते सदर खुल्या प्रक्रियेमध्ये सहभागी होवू शकतात.

प्रत :- वरिष्ठ तांत्रिक सहायक:-

२/- विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे या कार्यालयासाठी सन २०२५-२६ (०१.०४.२०२५ - ३१.०३.२०२६ या कालावधीसाठी) या आर्थिक वर्षाकरिता आवश्यक असणा-या कार्यालयीन लेखनसामग्री साहित्य व तद्नुषंगिक सर्व साहित्यांची खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबतचे पत्र , जाहीर निवेदन व खरेदीची व्याप्ती सोबत जोडले असून सदरचे पत्र या कार्यालयाच्या www.divcompune.maharashtra.gov.in या Website प्रसिध्द करणेत यावे. व दरपत्रक प्रसिध्द केलेबाबतचा अहवाल या कार्यालयास Email व्दारे सादर करावा.

# जाहिर निवेदन

## सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे या कार्यालयासाठी Wifi Router, Fiber connection जोडणेकरिता दरपत्रक मागविणेबाबत

---

कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे या कार्यालयासाठी Wifi Router, Fiber connection जोडणेकरिता खालील अटी व शर्ती यांच्या अधीन राहून आपणाकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

### अटी व शर्ती

१) दरपत्रक हे उपआयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे विभाग, पुणे यांचे नावे देण्यात यावे.

२) दरपत्रक सादर करण्याची मुदत दिनांक २८ /०८/२०२५ रोजी सायंकाळी १७.४५ वाजेपर्यंत राहील.

३) उपरोक्त मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २९ /०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. अपर आयुक्त (सा.प्र.), पुणे विभाग,पुणे यांच्या दालनात दरपत्रक समितीसमोर उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्यावेळी पुरवठादार यांना स्वत: उपस्थित राहता येईल किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीला दरपत्रके उघडण्याचे वेळी उपस्थित रहाता येईल. तथापि सदर प्रतिनिधींकडे पुरवठादाराचे प्राधिकारपत्र असणे आवश्यक आहे. अन्यथा त्यास उपस्थित राहण्यास अनुमती दिली जाणार नाही.

४) दरपत्रक सीलबंद लिफाफयात सादर करावे. सदर लिफाफयावर Wifi Router, Fiber connection जोडणे बाबत दरपत्रके असे नमूद करावे.

५) उपरोक्त मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

६) दरपत्रक पुरवठादाराने त्याचे लेटर हेडवरच सही व शिक्कानिशी सादर करणे आवश्यक आहे.

७) उपरोक्त लेटर हेडवर पुरवठा दाराने त्याचा GSTN Registration No. नमूद करावा.

८) अनुपस्थित असणाऱ्या पुरवठादारांना नंतर दरपत्रके मागविणे,उघडणे आणि स्विकृत करणे याबाबत तक्रार/हरकती करता येणार नाहीत.

९) उघडण्यात आलेल्या दरपत्रकातील सर्वात कमी दर बाबनिहाय स्विकृत करण्यात येतील.

१०) ज्या पुरवठादारांची बाबनिहाय दरपत्रके स्विकृत करण्यात येतील ,त्यांना विषयांकित कालावधीत दरपत्रकात नमूद करण्यात आलेल्या दराने पुरवठा करणेबाबत बंधपत्र सादर करावे लागेल. सदर बंधपत्र प्राप्त झाल्या नंतरच त्यांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार पुरवठा आदेश देण्यात येतील.

११) मागणी केलेले साहित्य विहीत विनिर्देशानुसार, गुणवत्तेचे,परिमाणाचे आणि सुस्थितीत प्राप्त झाल्यानंतरच त्याचे बिलाची रक्कम अनुदानाच्या उपलब्धतेच्या अधिन राहून पुरवठादारास वाजवी कालावधीत अदा करण्यात येईल.

१२) पुरवठादाराने मागणी केलेले साहित्य स्वखर्चाने या कार्यालयास पोहोच करावे लागेल. साहित्य पोहोच करताना त्यासोबत पुरवठा केलेल्या साहित्याचे बिल व डिलीव्हरी चलन देण्यात यावे.

१३) दरपत्रकात नमूद करावयाचे दर हे सर्व करांसहित नमूद करावे. त्यानुसारच स्विकृत दरपत्रकातील दरानुसारच संबंधित पुरवठादारास रकमेचे प्रदान करण्यात येईल.

१४) दरपत्रक तयार करताना पुरवठादाराने दरपत्रका सोबत अग्रेषण पत्रामध्ये (ForwardingLetter) या पत्राचा संदर्भ दयावा. तसेच या पत्रा मधील सर्व अटी व शर्ती पुरवठादारास मान्य असल्याचे स्पष्टपणे नमूद करावे.

१५) यादीत नमूद साहित्याचे दर दिलेल्या तपशिलाप्रमाणेच देणे बंधनकारक आहे. त्याशिवाय अन्य कंपन्यांचे/परिमाणांचे दर दिल्यास ते विचारात घेतले जाणार नाहीत.

१६) दिलेल्या तपशिलामध्ये नमूद संख्येपेक्षा खरेदी संख्या कमी/जास्त होवू शकते.

१७) पुरवठादाराचे पॅन असणे आवश्यक आहे. पॅन किंवा GST मध्ये काही अडचणी असल्यास त्या पुरवठादाराच्या नावाचा विचार केला जाणार नाही /सदर बाब निदर्शनास आल्यास त्याबाबत खरेदी समिती अंतिम निर्णय घेईल.

१८) दरपत्रकात नमूद दराने व त्याच दर्जाचे साहित्य पुरवठादाराने देणे बंधनकारक राहील.

१९) खरेदी साहित्याचा नमुना देणे पुरवठादारांवर बंधनकारक राहील.

२०) साहित्याचा पुरवठा,किंमती, दर्जा,देयके,अनुषंगिक सेवाविषयी इत्यादीबाबत कुठल्याही शाखेची तक्रार येणार नाही, याची दक्षता पुरवठादाराने घ्यावी.

२१) दरपत्रक मंजूर करणे बाबतचा अंतिम निर्णय हा दरपत्रक समितीचा असणार आहे.

२२) खरेदी करावयाच्या वस्तू शासननियमानुसार Gem Portal शासननिर्देशित संस्था किंवा शासकीय पुरवठादार यांचेकडून खरेदी

PDF Scanner ACE Scanner

करण्याचे अधिकार अंतिमरित्या कार्यालय प्रमुखांना असतील.

२३) सर्व कामकाज पूर्ण झाल्यावर देयकाची रक्कम अदा केली जाईल.

२४) आयकर वस्तू व सेवाकरासंबंधी सर्व कामकाज विहीत कालमर्यादेत पूणे करणे बंधनकारक राहिल.

२५) अंतिम पूरवठा आदेश पारित केलेनंतर आठ दिवसाचे आत उपरोक्त अटी-शर्ती मान्य असलेबाबत हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

15/9/25

(तुषार ठोंबरे )
अपर आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे विभाग,पुणे

PDF Scanner ACE Scanner

# विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे या कार्यालयासाठी
## Wifi Router, Fiber connection

| अ क्र | बाब | खर्च |
|---|---|---|
| १ | १०० mbps High Speed Internet Connection Static IP with Router | |
| २ | २०० mbps High Speed Internet Connection Static IP with Router | |
| ३ | ५०० mbps High Speed Internet Connection Static IP with Router | |
| ४ | १००० mbps High Speed Internet Connection Static IP with Router | |

14/9/25

(तुषार ठोंबरे)
अपर आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे विभाग,पुणे

PDF Scanner ACE Scanner